जावक क्र. 13030 २०२३
पुणे रेल्वे पोलीस ठाणे
दिनांक ११/१२/२०२३

मा. जनसंपर्क अधिकारी,
पुणे शहर
यांना सविनय सादर,

रिपोर्ट—सुप्रिया जगताप,स.पो.नि.पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे यांजकडून विनंती पूर्वक की,

विषय — गुन्हयातील मुलास सोडुन गेलेल्या अज्ञात पालकांचा शोध घेणेकामी/ तपासकामी पेपर प्रसिध्दी होणेबाबत...


संदर्भ—पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु.र.नं. ८०२/२०२३ कलम ३१७ भा.दं.वि.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती की, यांतील फिर्यादी नामे सुप्रिया नंदराज भोईटे वय ३५ वर्षे, धंदा. सरकारी नोकर (सपोनि), नेमणूक पुणे लोहमार्ग पोलस स्टेशन ,मो.नं. ८९७५८९८१०० या दि ०८/१२/२३ रोजी सकाळी ०७.३५ वा. सुमारास नाईट डयुटी कर्तव्य करीत करत असताना प्रवासी नामे मनोज दगडू मटेकरी वय २२ वर्ष रा.मंगळवेढा जि. सोलापूर यांनी एक दीड तें दोन वर्षाचे लहान पुरूष जातीचे बाळ पोलीस स्टेशन येथे सापडले आहे म्हणून आणून दिले.त्यांना हकिकत विचारता त्यांनी सांगितले की,मी प्लॅटफॉर्म क्र.०१ चे जिन्यावरून सोलापूर एडींग बाजूकडील वर जात असताना ओव्हर ब्रीज वर एक लहान मुल एकटेच रडताना दिसले म्हणून मी त्याला जवळ घेतले,त्याच्या आईवडीलांचा आजबाजूस शोध घेतला परंतू कोणीच न आल्याने आल्याने स्टेशन मास्तर यांना माहिती दिली, स्टेशन मास्तर यांनी माईक वरून अनांउन्समेंट करून बाळ सापडले आहे, स्टेशन मास्तर येथे संपर्क साधावा असे कळविले तरीहि कोणीच न आल्याने स्टेशन मास्तर यांनी पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे जाउन माहिती देण्यास सांगितले,म्हणून मी त्याला घेवुन पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे घेवुन आलो आहे असे सांगितले. त्यामुळे सदर बालकास आम्ही ताब्यात घेवुन पुन्हा एकदा संपुर्ण रेल्वे स्टेशन परिसरात त्याच्या आईवडीलांचा शोध घेतला तसेच माईकवरती पुन्हा एकदा अनाउन्समेंट केली. सीसीटिव्ही फुटेज पाहिले असता साधारणत: सकाळी ०६.३८ वाजता सोलापुर बाजुकडील पादचारी जिन्याजवळ तो एकटाच खेळताना व १० मिनीटांनंतर जिन्यातुन ओव्हर ब्रिजवर पायऱ्या चढुन जाताना दिसत आहे. त्याच्या आजुबाजुला कोणीही दिसुन आले नाही. सीसीटिव्हि कॅमेरे ब्रिजवर तसेच भरपुर ठिकाणी नसल्यामुळे सदर मुलाचे संपुर्ण फुटेज कव्हर झालेले दिसले नाही. म्हणुन सदर मुलाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी सफाई कामगार, फेरीवाले, हॉकर्स यांच्याकडे विचारणा केली परंतु कोणीही उपयुक्त माहिती दिली नाही. त्यामुळे साधारण सकाळी ०८.३० वाजता बालकल्याण समितीकडे माहिती देवुन सदर लहान बालकास कोणत्या संस्थेमध्ये दाखल करावे याबाबत आदेश घेतला असता त्यांनी व्हाट्सअप द्वारे सोफेश, ससुन रूग्णालय, पुणे या संस्थेमध्ये ठेवण्याबाबत आदेशीत केले. बालकल्याण समितीने ओळखीसाठी त्यांनी पुर्वी सुनिल व संस्थेत दाखल केल्यानंतर माधव असे नाव ठेवण्याबाबत संस्थेला

सांगितले. सदर मुलाची वैदयकिय तपासणी करण्यात आली असुन त्यास सकाळी १०.३० वाजता सोफेश, ससुन रूग्णालय, पुणे याठिकाणी दाखल केलेले आहे.

अज्ञात पालकांनी आपले मुलाचे पालन पोषण करण्यास असमर्थता दर्शवुन उघडयावर सोडुन टाकुन निघुन गेले आहे. म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| सोडुन गेलल्या मुलाचा फोटो | सोडुन गेलल्या मुलाचे वर्णन |
|---|---|
|  | नावः— माधव बालकाचे वर्णन पुरूष जातीचे बालक वयः— अंदाजे दिड ते दोन वर्षे वर्णः— निमगोरा चेहराः— गोल उंची :— २ फुट बांधाः—सडपातळ, नाकः— सरळ, घातलेले कपडे :— गुलाबी रंगाचा शर्ट व लाल रंगाचे जॅकेट असे कपडे अंगावर होते. |

तरी अज्ञात पालकांचा/आरोपींचा शोध घेणेसाठी तसेच बालकाचे नाव, गांव व वारसाचा तपास होणेकरीता पेपर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

मा. सविनय सादर

APZ

मार्फत,

मा. पोलीस निरीक्षक सो.

पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे